# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः20.02.2025** **वारःगुरुवार**

---

दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री म्हणून रेखा गुप्ता यांचा आज शपथविधी

९वी आशिया आर्थिक संवाद आजपासून पुण्यात

भारत-अर्जेंटिनादरम्यान लिथियम उत्खनन आणि खाणकाम क्षेत्रात सामंजस्य करार

आणि

आयसीसी चँपिअन्स करंडक क्रिकेट स्पर्धेतील पहिल्या सामन्यात न्यूझीलंडची पाकिस्तानवर मात, आज भारत-बांग्लादेशदरम्यान पहिला सामना दुबईत

**<u>रेखा-गुप्ता</u>**

दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री म्हणून रेखा गुप्ता यांच्या नावावर काल शिक्कामोर्तब झालं. भारतीय जनता पक्षाच्या दिल्ली विधीमंडळ पक्षाची काल संध्याकाळी बैठक झाली. त्यानंतर रेखा गुप्ता यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. त्यानंतर त्यांनी दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही के सक्सेना यांची राजनिवास इथं भेट घेतली आणि सरकारस्थापनेचा दावा सादर केला. आज दिल्लीतील रामलीला मैदानावर शपथग्रहण समारंभ दुपारी १२ वाजून ३५ मिनिटांनी होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्यासह २० राज्यांचे मुख्यमंत्री आणि इतर अनेक मान्यवर या समारंभाला उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. नुकत्याच झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत त्यांनी शालीमार बागची जागा जिंकली आहे. १९९२ मध्ये दिल्ली विद्यापीठाच्या दौलत राम महाविद्यालयातून विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून त्यांनी आपला राजकीय प्रवास सुरू केला. रेखा गुप्ता यांनी दिल्ली विद्यापीठ विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा म्हणून काम पाहिले आहे. यापुर्वी त्या दिल्लीत भाजप महिला मोर्चाच्या सरचिटणीस म्हणूनही कार्यरत होत्या.

गृहमंत्री अमित शहा आणि इतर केंद्रीय मंत्र्यांसह अनेक भाजप नेत्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. दिल्लीतील नवीन मुख्यमंत्री पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीला जगातील सर्वोत्तम राजधानींपैकी एक बनवण्याच्या संकल्पाच्या दिशेने समर्पित भावनेने काम करतील. असं शहा यांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

दिल्लीचे मावळत्या मुख्यमंत्री आतिशी आणि आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनीही भाजप नेत्या रेखा गुप्ता यांचं अभिनंदन केलं असून निवडणूक प्रचारादरम्यान दिलेली सर्व आश्वासने पूर्ण करतील अशी आशा व्यक्त केली.

**आर्थिक-संवाद**

९व्या आशिया आर्थिक संवाद कार्यक्रमाचं आजपासून तीन दिवस पुण्यात आयोजन करण्यात आलं आहे. आशिया आर्थिक संवाद हा परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचा वार्षिक उपक्रम असून भू-अर्थशास्त्राबाबत विविध मुद्यांवर विचारविनिमय होणार आहे. परराष्ट्र मंत्रालयाबरोबरच पुणे आंतरराष्ट्रीय केंद्राच्या सहयोगानं या कार्यक्रम होणार आहे. ट्रॅक वन पॉइंट फाइव्ह डायलॉग या विखंडन युगातील आर्थिक पुनरुत्थान आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता अशी या वर्षीच्या उपक्रमाची मध्यवर्ती संकल्पना आहे. भू-अर्थशास्त्रातील कृत्रिम बुध्दीमत्ता, ऑटोमेशन, सायबर सुरक्षा, सागरी क्षेत्रातील अर्थकारण आदी अनेक विषयावर चर्चा अपेक्षित आहे. विविध पक्षाचे राजकीय नेते, वरिष्ठ सरकारी अधिकारी, धोरणकर्ते तज्ञ, उद्योजक तसंच देशविदेशातील भूअर्थशास्त्रासाठी काम करणाऱ्या संस्थासंघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

**पंतप्रधानपरिषद**

जीवनाच्या विविध क्षेत्रातल्या व्यक्तींना एका मंचावर आणणाऱ्या सोल या दोन दिवसीय नेतृत्व परिषदेच्या पहिल्या आवृत्तीचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या होणार आहे. भूतानचे पंतप्रधान दाशो त्शेरिंग तोबगे या परिषदेचे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहाणार आहेत. राजकारण, क्रीडा, कला, माध्यमे, अध्यात्मिक जग, सार्वजनिक धोरण, व्यवसाय आणि सामाजिक क्षेत्रासारख्या विविध क्षेत्रातील नेते त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाबद्दल अनुभव सांगणार आहेत.

**इस्त्रायल**

गाझामध्ये बंदीवासात मृत्यू झालेल्या चार ओलिसांना आज इस्त्रायलकडे सुपूर्द केलं जाणार आहे. या नागरिकांची यादी इस्त्रायलला मिळाली असल्याचं इस्त्रायलचे पंतप्रधान बेन्जामिन नेतान्याहू यांच्या कार्यालयानं निवेदनाद्वारे काल जाहीर केलं. संबंधित व्यक्तीच्या कुटुंबियांना याबाबत इस्त्रायलच्या संरक्षण दलाकडून कल्पना देण्यात आली असल्याचं एका समाजमाध्यमावरील संदेशात नमूद करण्यात आलं आहे. या ओलिसांचा मृत्यू हा देशासाठी अत्यंत कठिण काळ असल्याचं सांगत पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**भारतअर्जेंटिना**

भारत आणि अर्जेंटिना यांच्या दरम्यान काल लिथियम उत्खनन आणि खाणकाम संदर्भात सहकार्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. कोळसा आणि खाण मंत्री जी किशन रेड्डी आणि कॅटामार्काचे राज्यपाल राऊल अलेजांद्रो जीलील यांच्यादरम्यान झालेल्या बैठकीत हा करार करण्यात आला. लिथियम उत्खनन आणि त्यातील गुंतवणूक संधींमध्ये सहकार्य वाढवण्यावर चर्चा झाली. दोनही देशांदरम्यान द्विपक्षीय भागीदारी सुनिश्चित करण्यासाठी वरीष्ठ अधिकाऱ्यांनी धोरणात्मक मुद्यांवर चर्चा केली. तसंच अर्जेंटिनाच्या खाण क्षेत्रात भारताचा सहभाग वाढवण्यासाठी ज्ञानाची देवाणघेवाण तसंच

पायाभूत सुविधांच्या पुरवठ्यावर भर देण्यात आला. या सहकार्य करारामुळे लिथियम उत्खनन प्रकल्पांना गती मिळेल, संसाधन सुरक्षा वृद्धी होऊन भारतीय कंपन्यांसाठी नव्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

**<u>भारतनेहरूपोर्ट</u>**

आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेचे महासचिव अरिझेनिओ डोमिंग्वेझ यांनी काल मुंबईच्या जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण तसेच इंडियन सेलर्स होम सोसायटीला भेट दिली. डोमिग्वेझ यांच्या तीन दिवसीय अधिकृत दौऱ्यामध्ये त्यांनी बंदरावरील कामातील गुंतागुंत आणि शाश्वत बंदर विकासाच्या संधींविषयी माहिती घेतली तसंच बंदर प्रमुखांशी चर्चा केली.  तसंच सागरी परिसंस्थेत नेहरू बंदर प्राधिकरणाची भूमिका समजून घेतली. बंदरावरील कामांची शाश्वतता, जलवाहतुकीतला कार्बनचा वापर कमी करुन, पर्यावरणपूरक सागरी वाहतुकीला चालना देणं आदी प्रामुख मुद्यांवर चर्चा केली.

**<u>ट्रम्पझेलेन्स्की</u>**

युक्रेनच्या युद्धासाठी राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की जबाबदार असून ते अत्यंत अक्षम नेता आणि वाटाघाटीत कमकुवत असणारा नेता असल्याची टीका  अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. रशिया-युक्रेन युध्द संपवण्याच्या उद्देशानं वाटाघाटी घडवून आणण्यासाठी सध्या चर्चा सुरु आहे. या चर्चेतून युक्रेनला वगळण्यात आल्याबद्दल युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर झेलेन्सकी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी ही टीका केली आहे. तर प्रत्युत्तरादाखल, झेलेन्स्की यांनी ट्रम्प यांचा आदर करत असले तरीही दुर्देवाने ट्रम्प रशियाने पसरवलेल्या चुकीच्या माहितीच्या जगात वावरत असल्याचं म्हटलं आहे. दरम्यान, रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांनी ते पुन्हा युक्रेनसंदर्भात वाटाघाटी करायला तयार असल्याचं वृत्त रशियन माध्यमांनी दिलं आहे.

**<u>रिझर्वबँक</u>**

२०२४ - २५ या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत आर्थिक उलाढालीत वाढ नोंदवण्यात आली अशी माहिती भारतीय रिझर्व बँकेनं प्रसिध्द केलेल्या मासिक प्रसिध्दीपत्रात देण्यात आली आहे. घरगुती वापराच्या वस्तूंचं उत्पादन आणि त्यांचा वापर वाढवण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या असून या सगळ्यांचं वित्तीय स्तरावर एकत्रीकरण करण्यावर नवीन आर्थिक वर्षाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात भर देण्यात आल्याचं पत्रकांत नमूद करण्यात आलं आहे.  गेल्या आर्थिक वर्षात ४ पुर्णांक १ टक्के असेलेलं  भांडवली गुणोत्तर २०२५-२६ मध्ये  ४.३ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.  रबी हंगामातील पिकांच्या उत्पादनामुळं अन्नधान्याच्या किमती, विशेषतः भाज्यांच्या किमतींमध्ये मोठी घसरण झाली असल्याचं यामध्ये नमूद करण्यात आलं आहे.

**<u>भारतअवकाश</u>**

भारत अनेक क्षेत्रात आघाडीवरचा देश असून, विविध क्षेत्रात नेतृत्व प्रदान करत तसंच नवनवीन उपक्रम राबवून जागतिक स्तरावर मानदंड प्रस्थापित करत असल्याचं प्रतिपादन विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी केलं आहे. काल एका मुलाखतीत बोलताना भारताच्या अवकाश क्षेत्राविषयी बोलताना देशाने या क्षेत्रात अभूतपूर्व परिवर्तन केलं असून, महत्त्वकांक्षी मोहिमा आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यातही वाढ

झाली आहे तर स्पेस डॉकिंग म्हणजे स्पेडेक्स भारताच्या तांत्रिक प्रगतीचे उदाहरण असल्याचे सांगून गगनयान, चांद्रयान-४ आणि भारतीय अंतरीक्ष स्थानकासह भविष्यातल्या अवकाश मोहिमांसाठी मार्ग मोकळा झाल्याचंही सिंग यांनी मुलाखतीत सांगितलं. अंतराळ संशोधनात देशाच्या वाढत्या वर्चस्वाला अधोरेखित करणाऱ्या टप्प्यात, चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरून येणाऱ्या निष्कर्षांची वाट पाहात असल्याचंही सिंग यांनी सांगितलं आहे. जैवतंत्रज्ञान आणि जैव अर्थव्यवस्थेत भारताच्या अग्रणी भूमिकेवरही प्रकाश टाकताना, देशानं  कार्बन उत्सर्जन ५० टक्क्यांनी कमी करण्याचं उद्दीष्ट ठेवत २०४७ पर्यंत १०० गिगावॅट अणुऊर्जेचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवलं असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<u>जम्मूकाश्मिरसुशासन</u>**

देशातल्या सामाजिक आर्थिक समस्यांशी निगडीत प्रश्नावर काम करणाऱ्या समीर कोचर ऑर्गनायझेशन फॉर चेंज या विचारमंचाच्या वतीनं सुशासनासाठी देण्यात येणाऱ्या पुरस्काराने जम्मू स्मार्ट सिटी लिमिटेडचा गौरव करण्यात आला. संस्थेच्या १०० व्या शिखर परिषदेच पुरस्काराचं वितरण झालं. डिजीटल प्रशासन, नागरीक सेवा आणि कार्यक्षम नगरपालिका सेवा पुरवणे यासाठी हा पुरस्कार देण्यात आल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहराने कळवले आहे. जम्मू स्मार्ट सिटीचे सीईओ डॉ. देवांश यादव यांनी हा पुरस्कार स्वीकारला. नागरिक सेवा, डिजिटल परिवर्तन आणि पर्यावरणीय शाश्वततेवर भर देऊन,जम्मू शहराला भारतातील एक आदर्श स्मार्ट सिटी म्हणून स्थान देत रहिवाशांच्या जीवनमानाचा दर्जा वाढवण्यासाठी जेएससीएल काम करत असल्याचं यादव यावेळी म्हणाले.

**<u>टेबल-टेनिस</u>**

चीनमधील शेन्झेन इथं झालेल्या आशियाई चषक टेबल टेनिस स्पर्धेच्या पहिल्या दिवशी भारताच्या श्रीजा अकुलानं काल महिला एकेरी गट सामन्यात कतारच्या आया मोहम्मदचा ३-० असा पराभव केला. आज, श्रीजाचा सामना दुसऱ्या गट सामन्यात जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या चीनच्या सुन यिंगशाशी होईल.

**<u>पॅरालिम्पिकस्पर्धा</u>**

चेन्नईत सुरू असलेल्या राष्ट्रीय पॅरालिम्पिक्स ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत, विश्वविजेत्या दीप्ती जीवनजीने महिलांच्या ४०० मीटर टी२० प्रकारात सुवर्णपदक पटकावले तर हरियाणाच्या पूजा आणि भुवी अग्रवाल हिने अनुक्रमे रौप्य आणि कास्यपदक जिंकले. पुरूषांच्या गोळा फेक स्पर्धेत सोमन राणाने पॅरिसविजेत्या होकाटो सेमाला हरवत सुवर्णपदकाला गवसणी घातली.

**<u>हॉकी</u>**

आंतरराष्ट्रीय हॉकी संघटनेच्या वतीनं आयोजित साखळी हॉकी सामन्यांमध्ये भारतीय पुरूष संघानं काल रात्री जागतिक विजेत्या जर्मनीवर 1-0 असा विजय मिळवत मंगळवारच्या पराभवाची परतफेड केली. भारताच्या गुरजंत सिंगने सामन्यातील एकमेव गोल केला. भारतीय संघाचा उद्या आर्यलंडशी सामना होणार आहे.

**क्रिकेट**

नवव्या आयसीसी चँपिअन्स करंडक क्रिकेट स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात काल कराची इथं न्यूझीलंडनं पाकिस्तानला ६० धावांनी हरवलं.

न्यूझीलंडनं प्रथम फलंदाजी करताना ३२० धावा केल्या होत्या. तर प्रत्युत्तरादाखल पाकिस्तान सर्व गडी बाद २६० धावा करू शकला. स्पर्धेतला भारताचा पहिला सामना आज बांग्लादेशच्या संघाशी दुबई इथं होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार